| MHLA150009712018 | | | |
|---|---|---|---|
| | प्राप्त दिनांक | : | २६/११/२०१८ |
| | नोंदणी दिनांक | : | २६/११/२०१८ |
| | निकाल दिनांक | : | १८/०७/२०२६ |
| | कालावधी | : | ०७व. ०७म. २२दि. |

**भाग– अ**

फॉर्म क्र. XXXII

(न्यायनिर्णयाचे शिर्षक पान)

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय VI परिच्छेद क्र. ४४ (I))

| | | |
|---|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्यायालय क्र.१ चाकूर ता. चाकूर जि. लातूर यांचे न्यायालयात**<br>(पिठासीन अधिकारी – व्ही.एस. वाघमोडे यांच्या समोर.) | |
| | **नियमीत फौजदारी खटला क्र.१४५/२०१८**<br>नि.क्र. | |
| फिर्यादी | महा. शासन द्वारा– पोलीस ठाणे चाकूर, ता. चाकूर जि. लातूर | |
| विशेष सहा. सरकारी अभियोक्ता | | श्री.एस.एम. शेटे |
| आरोपी | १. | अमोल किशन कांबळे,<br>वय – ३० वर्ष, धंदा – मजूरी, |
| | २. | किशन इराप्पा कांबळे,<br>वय – ७० वर्ष, धंदा – मजूरी, |
| | ३. | कल्पना गंगाधर कांबळे,<br>वय – ३६ वर्ष, धंदा – मजूरी,<br>सर्व रा. जानवळ ता. चाकुर जि. लातूर |
| | ४. | नामदेव उत्तम गायकवाड,<br>**...मयत.** |

| | | |
|---|---|---|
| आरोपींचे विधीज्ञ | | श्री. डी.पी. महालींगे |

## भाग – ब

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय VI परिच्छेद क्र. ४४ (ii))

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | २६/११/२०१८ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | ०६/१०/२०१८ |
| दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | २६/११/२०१८ |
| दोषारोप निश्चीती दिनांक | ०४/१०/२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०४/१०/२०१९ |
| न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | -- |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १८/०७/२०२६ |
| जर, दोषसिध्दी झाली असेल तर शिक्षा फर्माविण्याचा दिनांक | - - |

## आरोपीचा तपशिल

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नांव | अटकेचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हा कलम | दोषमुक्ती किंवा दोषसिध्दी | शिक्षा | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौ.प्र.सं. कलम ४२८ करीता. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अमोल किशन कांबळे | दि.०९.१०.२०१८ | दि.०९.१०.२०१८ | भा दं वि कलम ३५४,३२४,३३६, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे. | दोषमुक्त. | -- | -- |
| २ | किशन इराप्पा कांबळे | दि.०९.१०.२०१८ | दि.०९.१०.२०१८ | भा दं वि कलम ३५४,३२४,३३६, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे. | दोषमुक्त. | -- | -- |
| ३ | कल्पना गंगाधर कांबळे | दि.०९.१०.२०१८ | दि.०९.१०.२०१८ | भा दं वि कलम ३५४,३२४,३३६, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे. | दोषमुक्त. | -- | -- |

## भाग 'क'

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय VI परिच्छेद क्र. ४४ (iii))

## अभियोगपक्ष/ बचावपक्ष/ न्यायालयीन साक्षीदार यांची यादी.

**–अभियोगपक्ष –**

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०१ | सुमीत अशोक डोंबे | जखमी साक्षीदार |
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०२ | रंभाबाई अशोकराव डोंबे | जखमी साक्षीदार |
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०३ | गौतम आनंदा कांबळे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०४ | लिंबाजी आनंदा कांबळे | घटनास्थळ पंच साक्षीदार |
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०५ | डॉ. श्रीकांत नामदेवराव शेळकीकर | वैद्यकीय अधिकारी |

ब– **–बचावपक्षाचे साक्षीदार –**

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | –– | – |

क– **–न्यायालयीन साक्षीदार –**

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | –– | – |

अभियोगपक्ष/ बचावपक्ष / न्यायालय, यांचे निशाणी यादी

अ– **–अभियोगपक्ष–**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| १ | नि.क्र. ४२ | साक्षीदार क्र.४ यांची सही |
| २ | नि.क्र. ४७,४८ | जखमेचे प्रमाणपत्रे |

ब – **–बचावपक्ष–**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क – –न्यायालयाचे निशाणी क्रमांक –**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ड – न्यायालय निशाणी कागदपत्रांची यादी**

| **अनु.क्र.** | **कागदपत्रे** | **निशाणी क्र.** |
|---|---|---|
| | -- | -- |

**इ. –भौतिक वस्तु–**

| **अनु.क्र.** | **भौतिक वस्तु क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| ०१ | -- | -- |

**– न्यायनिर्णय –**

(पारीत दिनांक १८.०७.२०२६)

प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३५४, ३२४, ३३६, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये अपराध केले बाबत खटला चालवण्यात आला.

अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे आहे.

२. दि. ०६.१०.२०१८ रोजी ११.३० वा. मौजे जानवळ ता. चाकुर जि. लातूर येथे फिर्यादी (महिला असल्यामुळे नाव नमुद करण्यात आले नाही.)त्यांच्या बहीणीची मुलगी मनिषा हिची तब्येत ठिक नसल्यामुळे तिला भेटण्यासाठी जात होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज मंदीराजवळून जात असतांना आरोपी अमोल दारात थांबला होता. आरोपीने फिर्यादीला तुम्ही कुठे

जात आहात असे विचारले, तेंव्हा फिर्यादीने माझे बहीणीच्या मुलीकडे जात आहे असे सांगितले, तेंव्हा आरोपीने त्यांना, घरात या, मला तुम्हाला कांही बोलायचे आहे असे म्हणाला त्यावेळी फिर्यादीने आरोपीस इथच बोला काय बोलायचे आहे ते असे म्हणाल्यामुळे आरोपीने फिर्यादीला, तुम्ही मजूरीने कामाला कशाला जाता, तुम्हाला काय पाहीजे ते मी पुरवितो असे म्हणून वाईट हेतूने फिर्यादीच्या साडीच्या पदराला धरुन ओढले व घरात या असे म्हणू लागला. त्यावेळी फिर्यादीने त्यांच्या साडीला झटका देऊन ओढले व आरडा ओरड केली. त्या झटापटीत फिर्यादीचे गळयातील मंगळसुत्र तुटले. त्यावेळी फिर्यादीचे दिर सुमीत यांनी आरोपीला विचारले असता आरोपीने त्यांना, तु कोण विचारणार म्हणून शिवीगाळ केली त्यामुळे त्या दोघांत भांडण लागले. त्यावेळी आरोपी नामदेव, किशन व कल्पना या सर्वांनी मिळून त्यांना धक्का बुक्की केली. फिर्यादीची सासू भांडण सोडवित असतांना आरोपींनी त्यांच्यावर दगडफेक केली. त्यामध्ये फिर्यादीची सासू यांच्या उजवे हातावर व दिर यांच्या उजव्या हाताच्या नळीवर मार लागला. त्यावेळी अच्युत गव्हाणे यांनी भांडणाची सोडवा सोडव केली. आरोपींनी त्यांना तुम्हाला बघुन घेताव म्हणून जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीने आरोपीविरोधात पोलीस ठाणे चाकूर येथे तक्रार दिली.

३. प्रस्तुतच्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस ठाणे चाकूर येथे दि.०६.१०.२०१८ रोजी गु.र.क्रमांक ३२८/२०१८ भा.दं.वि. कलम ३५४,३२३,३३६,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. तपासी अधिकारी श्री. जे.एल. भंडे, पो.ना. ब.नं. ६२२ पो.स्टे. चाकूर यांनी तपासादरम्यान घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले आणि तपास पूर्ण झालेनंतर आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. वरील गुन्हयास अनुसरुन आरोपीविरुध्द दोषारोप नि.क्र.१३ नुसार भा.दं.वि. कलम ३५४,३२४,३२३,३३६,५०४,५०६ सह कलम ३४ ठेवून आरोपांचे स्वरुप समजावून सांगितले असता आरोपींनी त्यांच्यावरील आरोप नाकारुन खटला पुढे चालविण्याची विनंती केली व त्याबाबतचे निवेदन नि.क्र.१४ ते १७ वर दाखल आहे. संपरिक्षेदरम्यान आरोपी क्र. ३ नामदेव उत्तम गायकवाड हे मयत झाल्यामुळे नि.क्र. १ वर आदेश पारीत करुन सदरचे प्रकरण त्याच्याविरुध्द अवसायनात काढयात आले व उर्वरित आरोपींविरुध्द पुढे चालविण्यात आले. आरोपी क्र. १ ते ३ यांच्या विरुध्द फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम ३१३ प्रमाणेचे बयाण नि.क्र. ६३ ते ६५ नुसार नोंदविण्यात आले.

५. निर्णयासाठी उपस्थित झालेले मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि.०६.१०.२०१८ रोजी ११.३० वा. मौजे जानवळ ता. चाकुर जि. लातूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज मंदीराजवळ, आरोपीने फौजदारीपात्र बलप्रयोग करुन फिर्यादीचा विनयभंग केला व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम ३५४, नुसार गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाने शाबीत केली काय? | ..नकारार्थी |
| २. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन ईच्छापुर्वक फिर्यादी व साक्षीदार यांना दगडाने मारहाण करुन दुखापत केली व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम ३२४ सह कलम ३४ नुसार गुन्हा केला, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली काय ? | ..नकारार्थी |
| ३. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन हयगय व निष्काळजीपणे इतरांची सुरक्षीतता धोक्यात येईल अशी दगडफेक केली व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम ३३६ सह कलम ३४ नुसार गुन्हा केला, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली | ..नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | काय? | |
| ४. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन ईच्छापुर्वक फिर्यादी यांना लाथा बुक्यांनी मारहाण करुन दुखापत केली व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम ३२३ सह कलम ३४ नुसार गुन्हा केला, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली काय ? | ..नकारार्थी |
| ५. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी यांना शिवीगाळ करुन त्यांना अपमानित केले व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम ५०४ सह कलम ३४ नुसार गुन्हा केला, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली काय ? | ..नकारार्थी |
| ६. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी यांना जिवे ठार मारण्याची धमकी देऊन फौजदारीपात्र धाकदपटशा दाखविला व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम ५०६ नुसार गुन्हा केला, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली काय ? | ..नकारार्थी |
| ७. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>का र ण मि मां सा</u>

### <u>मुद्दे क्र. १ ते ६ करीता</u> –

६. चर्चेची पुनरावृत्ती टाळण्याकरीता मुद्दे क्र. १ ते ६ हे एकत्रीतरित्या चर्चेस घेण्यात आलेले आहेत.

७. साक्षीदार क्र. २ रंभाबाई अशोकराव डोंबे व साक्षीदार क्र. ३ गौतम आनंदा कांबळे, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, घटना किती तारखेला, कोणत्या ठिकाणी व किती वाजता घडली हे त्यांना सांगता येत नाही. घटना काय झाली होती हे त्यांना माहीत नाही. तसेच अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये त्यांनी, पोलीस बयाणातील अधोरेखांकित भाग अ, पोलीसांना सांगितला नव्हता, ते त्यांच्या बयाणामध्ये का नमुद आहे याचे कारण त्यांना सांगता येत नाही. तसेच आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये साक्षीदार क्र. २ यांनी असे कथन केले की, फिर्यादी

ही त्यांची सुन आहे, ती मयत झाली आहे. फिर्यादी सोबत आरोपीने छेडछाडीचा प्रकार केला नव्हता. तसेच फिर्यादीला शिवीगाळ देखील केली नव्हती. तसेच त्यांनी हे मान्य केले की, प्रस्तुत प्रकरणाबाबत त्यांची आरोपीसोबत तडजोड झाली आहे.

८. साक्षीदार क्र. ४ लिंबाजी आनंदा कांबळे, घटनास्थळ पंच साक्षीदार यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, पोलीसांनी त्यांना कोठेही बोलाविले नाही व त्यांच्या समोर कोणतीही कार्यवाही झाली नाही. पोलीसांची व त्यांच्या गावातील रस्त्यावर भेट झाली होती. घटनास्थळ पंचनामा नि.क्र. ४२ वर त्यांची सही आहे, परंतू त्यातील मजकूर त्यांना माहीत नाही. तसेच अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये, पोलीसांनी त्यांच्या समक्ष ज्या ठिकाणी मारहाणीची घटना झाली होती त्या जागेत पंचनामा केला व तो त्यांना वाचून दाखवून त्यावर त्यांची सही घेतल्याचे नाकारले.

९. सदर प्रकरणातील फिर्यादी (महिला असल्यामुळे नाव नमुद करण्यात आले नाही) मयत असल्याबाबत अहवाल सादर करण्यात आला आहे व ती बाब साक्षीदार क्र. २ यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये मान्य केली आहे. त्यामुळे सदर साक्षीदार यांना प्रकरणात तपासण्यात आले नाही. साक्षीदार क्र. १ यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दि.१०.०६.२०१८ रोजी फिर्यादी यांनी त्यांना सांगितले होते की, आरोपी अमोल यांनी त्यांचा पदर धरुन तुम्ही कामाला का जाता, घरी बसून खा, मी पुरवत जाईन असे म्हणून विनयभंग केला होता. परंतू सदरचा पुरावा हा ऐकीव पुरावा असल्यामुळे त्यावर विश्वास ठेवता येणार नाही. सदर प्रकरणातील जखमी साक्षीदार क्र.२ यांनी त्यांच्या सरतपास व उलटतपासमध्ये घटना पुर्णपणे नाकारली आहे. तसेच साक्षीदार क्र. १ यांनी त्यांच्या उलटतपासात हे मान्य केले आहे की, आरोपी अमोल याने त्यांच्या विरुध्द केस केली होती, यावरुन साक्षीदार क्र. १ व आरोपी क्र. १ मध्ये पुर्व

वैमनस्य आहे ही बाब समोर येते. अशा परिस्थीतीमध्ये साक्षीदार क्र. १ यांच्या पुराव्यावर संशय निर्माण होतो.

१०. साक्षीदार क्र. १ यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, आरोपी क्र. २ ते ४ यांनी त्यांना दगडाने मारले होते. साक्षीदार क्र. ५ यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दि. ०६.१०.२०१८ रोजी त्यांनी साक्षीदार क्र. १ यांना तपासले होते. त्यांना साक्षीदार क्र. १ यांच्या छातीवर मार लागलयाचे व उजव्या कोपरावर सुज आल्याचे दिसून आले होते. परंतू सदर प्रकरणातील जखमी साक्षीदार क्र. २ व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार क्र. ३ यांनी घटना पुर्णपणे नाकारली आहे. अशा परिस्थीतीमध्ये साक्षीदार क्र. १ यांच्या पुराव्यावर संशय निर्माण होतो.

११. सदर प्रकरणामध्ये अभियोगपक्षातर्फे घटनास्थळ पंचनामा सिध्द करण्यात आला नाही. तपासी अधिकारी यांना तपासण्यात आले नाही. घटनेतील जखमी साक्षीदार क्र. २ व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार क्र.३ यांनी घटना पुर्णपणे नाकारली आहे. त्यामुळे आरोपीं विरुदध कोणत्याही गुन्हया बाबत न्यायालयासमोर पुरावा आलेला नाही. सर्व चर्चेवरुन आरोपीनी वर नमुद गुन्हा केला ही बाब अभियोगपक्षाला निःसंशयपणे शाबीत करता आली नाही. त्यामुळे मुद्दे क्र. १ ते ६ चे उत्तर नकारार्थी देण्यात येते. तसेच मुद्दा क्र.७ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आ दे श</u>**

| | |
|---|---|
| १. | आरोपी अमोल किशन कांबळे, किशन इराप्पा कांबळे, कल्पना गंगाधर कांबळे, यांना भारतीय दंड विधान कलम ३५४, ३२४, ३३६, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | आरोपींनी पुर्वीच दिलेले वैयक्तिक बंधपत्र व जात मुचलका हे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७-ए च्या तरतुदी करीता आव्हान कालावधीपर्यंत कायम करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| ३. | (सदरहू न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.) |

Digitally signed by VIKAS SHIVAJI WAGHMODE
Date: 2026.07.18 15:25:42 +0530

दिनांक – १८.०७.२०२६

(व्ही.एस. वाघमोडे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, चाकूर.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the stenographer | : | M. B. Pathan |
| Name of the Court | : | Civil Judge J.D. & J.M.F.C, Chakur. |
| Date of Order/ Judgment | : | 18/07/2026 |
| Order/Judgment signed by Presiding Officer on | : | 18/07/2026 |
| Order/Judgment uploaded on | : | 18/07/2026 |